# विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी मी राबविलेले व राबवत असलेले नाविन्यपूर्ण उपक्रम

विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी मी राबविलेले नाविन्यपूर्ण उपक्रम याचे सादरीकरण करण्यापूर्वी उपस्थितांना प्रथम सुहृद मंडळ ही संस्था व आमच्या शाळेबद्दल थोडक्यात सांगते.

कर्णबधिरांचे शिक्षण व पूनर्वसन हे ध्येय डोळयांसमोर ठेवून १ ऑगस्ट १९७३ रोजी पुण्यात सुहृद मंडळाची स्थापना झाली. ५ विद्यार्थ्यांना घेऊन सुरु झालेल्या संस्थेच्या चार शाळांमधे आज ५०० च्या आसपास कर्णबधिर विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संस्थेचे शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालय व १८ वर्षावरील मुलांसाठी तंत्रनिकेतन आहे.


मी ज्या शाळेतून आलेली आहे. ती पुण्यातील धायरी या उपनगरातील निवासी शाळा १९८४ ला सुरु झाली. ४ ते १४ वयोगटातील मुलेमुली येथे वसतिगृहात राहून शिक्षण घेत आहेत. हवेशीर वर्गखोल्या, प्रशस्त मैदान, इ-लर्निंग, संगणक कक्ष, प्रत्येक मुलाला कानामागील श्रवणयंत्र, निवासाची, आहाराची उत्तम सोय, अशा सर्व सोयी येथे आहेत. वर्षातील दहा महिने मुले आमच्या जवळच असतात. त्या दृष्टीने त्यांच्यावर उत्तम संस्कार शिक्षणाच्या बरोबरीने करणे हे पालकांपेक्षा आम्हा शिक्षकांचे कर्तव्य जास्त आहे. हे माझ्या लक्षात आले. शिवाय ४ ते १४ हा वयोगट संस्कारक्षम वयामधला आहे. ओल्या मातीला जसा आकार देऊ तशी मूर्ती घडते. त्याप्रमाणे या लहान निवासी कर्णबधिर मुलांवर उपक्रमांच्या माध्यमातून चांगले संस्कार केले तर ही मुले भविष्यात इतर सर्वसामान्य मुलांप्रमाणे भारताचे उत्तम नागरिक बनू शकतील ही विचारधारा घेऊन शिक्षणाबरोबर सण / उत्सव / विशेष दिन यांच्या माध्यमातून काही वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम दोन भागात मी राबवत आहे.

# सुहृद मंडळ, पुणे संचालित

## धायरी कर्णबधिर मुलांची शाळा (निवासी)






## भाषावाढीसाठी घेतले जाणारे उपक्रम

या उपक्रमांविषयी सांगण्यापूर्वी कर्णबधिरांच्या शिक्षणाबद्दल थोडक्यात सांगते. जन्मत: / जन्मानंतर कर्णबधिरत्व आलेल्या मुलाला विशेष शाळेत आल्यानंतर चित्र, वस्तू व प्रतिकृती दाखवून त्याबरोबर संबंधित शब्दचिठ्ठी दाखवून प्रत्येक घटकाची ओळख दिली जाते. डोळयांनी तो सारे बघत असतो, पण त्याचा शब्द त्याला माहीत नसतो. त्यामुळे त्याची भाषा / शब्दसंपत्ती वाढवणे, ती अर्थपूर्ण करणे, त्यासाठी वेगवेगळया पद्धती वापरणे आणि सर्वसामान्य मुलांची पाठ्यपुस्तके सुलभ करुन शिकवणे हे आमच्या शाळांमधून चालते. पण ही भाषावाढ रंजक पद्धतीने घेतल्यास त्याची शिकण्यामधली रुची वाढते व त्याच्या शब्दसंपत्तीत नकळत अर्थपूर्ण भर पडते. हे माझ्या लक्षात आल्याने भाषावाढीसाठी पुढील नाविन्यपूर्ण उपक्रम मी राबवले व सहशिक्षकांच्या मदतीने राबवत आहे.

# शब्दपेटी



पायरी १ ते ४ (म्हणजे पूर्व प्राथमिकचे वर्ग) मधील विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम मी सुरु केला आहे. यामध्ये रोज शिकवून झालेल्या अभ्यासातील शब्द व चित्र एका आकर्षक पेटीत शिक्षक रोज साठवतात. शनिवारी शेवटच्या तासाला शिक्षक पेटी उघडतात,

व त्यातील कोणतेही शब्द / चित्र मुलांना दाखवून त्या पेटीतील संबंधित चित्र / शब्द मुलाला काढून द्यायला सांगितले जाते. यातून मुलाला किती समजलंय हे कळते, उजळणी होते व दृढीकरण होते. पेटीतून चित्र / शब्द शोधायचे याची मुलांना गंमत वाटते व गमती जमतीतून नकळत भाषावाढ होत जाते.






# वर्तमानपत्रातील बातमी

मुलांच्या पातळीनुसार रोज वर्तमानपत्रातील बातमी घेतली जाते. त्यातून आपले शहर, राज्य, देश यामधील घडामोडी मुलांना समजतात. नवीन शब्दांची भर पडते. वर्तमानपत्र पाहण्याची ओढ निर्माण होते. वाचनाची गोडी लागते. बातमीतील शब्द वर्तमानपत्रात अजून कोठे सापडतात का हे शोधण्याची सवय लागते. (गेली १० वर्षे हा उपक्रम चालू आहे.)

# आमचा मित्र - (हस्तपुस्तिका)


रोजच्या वर्तमानपत्रातील मुलांना समजतील अशा छायाचित्रांवर आधारित हस्तपुस्तिका, दरमहा खास वसतिगृहासाठी बनवली जाते. वर्तमानपत्रातील ऋतुंनुसार येणारी, खेळांची, अपघाताची, प्रदर्शनाची, उद्घाटनाची, जाहिरातींची छायाचित्रे मुलेच कापतात, चिटकवतात. त्याखाली अर्थपूर्ण शब्द / ३-४ शब्दांचे छोटे वाक्य शिक्षक लिहितात. मुलांचा शब्दसंग्रह, भाषा वाढण्याचा प्रयत्न यातून केला जातो. वसतिगृहातील मोकळ्या वेळात मुले ही पुस्तिका वाचतात.











# विद्यार्थी प्रतिनिधी निवडणूक

दरवर्षी इ. ३ री व ४ थी च्या विद्यार्थ्यांमधून प्रतिनिधी निवडले जातात. त्यासाठी उमेदवार, निवडणूक चिन्हे, मतपत्रिका, प्रचार, मतदार यादी, मतपेटी, मतदानकक्ष, मतदान, मतमोजणी या सर्व गोष्टी प्रत्यक्ष घेऊन निवडणूक होते. (गेले १८ वर्षे हा उपक्रम चालू आहे.) त्यातून विद्यार्थी प्रतिनिधी, सहल, संमेलन, गणवेश, शिस्त, स्वच्छता असे प्रतिनिधी निवडले जातात. वर्गात या निवडणुकीची छोटीशी बातमी घेतली जाते. त्यातून सर्व नवीन शब्दांची ओळख होते.







# अक्षर आठवडा

यामध्ये शाळेच्या पॅसेजमध्ये एकच अक्षर आठवडाभर लावून ठेवले जाते. त्या अक्षराचे बाराखडीनुसार शब्द मुलांनी वर्तमानपत्र, पुस्तक, रस्त्याने जाता येता दिसणारे शब्द पाहून वहीत लिहून ठेवायचे.






शनिवारी वर्गात प्रत्येकाने ते दाखवायचे. न समजलेल्या शब्दांचा अर्थ शिक्षिकेने समजावून द्यायचा. यामुळे शोधणे, वाचणे, लिहिणे या कौशल्यांचा विकास सहजपणे होतो आणि शब्दसंग्रहात सहजी भर पडत जाते.

# अळीचा प्रवास



भाषावाढीसाठी घेतल्या जाणाऱ्या या उपक्रमांमधून

मुलांची भाषा वाढ, शब्दसंग्रह वाढत आहेच.

पण वाचन, लेखन कौशल्य, शोधक वृत्ती निरीक्षण

शक्ती यांचाही जाता जाता विकास होत आहे.

# सण / उत्सव / विशेष दिन - यावर आधारित प्रासंगिक उपक्रम





## राखीपौर्णिमा

शाळेच्या आवारातील वृक्षांना मुले राख्या बांधतात. वृक्ष ही आपली संपत्ती आहे. वृक्षांचे अनेक फायदे आपल्याला होतात. त्यामुळे कृतज्ञता म्हणून त्यांना राखी बांधली जाते. स्थानिक नगरसेवक व पोलीस यांनाही राख्या बांधून त्यांच्याशी मित्रत्वाचे नाते जोडण्याचा प्रयत्न केला जातो.

तसेच गेल्यावर्षीपासून सीमेवरील जवानांना मुलांकडून राख्या तयार करुन पाठवायला सुरुवात केली आहे. आपल्या रक्षणकर्त्यांचा आदर यामधून शिकवला जात आहे.



# डॉक्टर डे

आपल्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या डॉक्टरांना डॉक्टर डे निमित्त मुलांनी गुलाब पुष्प देऊन कृतज्ञता व्यक्त केली.





# १ ऑक्टोबर - ज्येष्ठ नागरिक दिन

दरवर्षी या दिवशी इ. ४ थी मधील मुले शिक्षकांबरोबर एखाद्या वृद्धाश्रमाला भेट देतात. तेथील वृद्धांचे एखादा कार्यक्रम सादर करुन मनोरंजन करतात. आता आपल्या आजोबांना, पुढे आईबाबांना सांभाळायचे, त्यांना असे आश्रमात ठेवायचे नाही हा संस्कार, ही शिकवण बालवयात दिली जात आहे.







# २ ऑक्टोबर - म. गांधी जयंती

दरवर्षी गावातील दोन सफाई कर्मचाऱ्यांचा सत्कार विद्यार्थी प्रतिनिधीच्या हस्ते केला जातो. शहर, रस्ते, गाव स्वच्छ ठेवणारी माणसे आपल्या आरोग्याची नकळत काळजी घेतात. त्यासाठी त्यांना धन्यवाद देण्यासाठी हा सत्कार असतो. तसेच, कोणतेही काम हलके नसते हा संस्कार मुलांच्या मनावर केला जातो.



# कोजागिरी पौर्णिमा व बालदिन



इतर अपंग मुले, शालाबाह्य मुले, गरीब वसाहतींमधील मुले शाळेत बोलावून त्यांच्याबरोबर खेळ घेतले जातात.



या मुलांच्या समस्यांची जाणीव कर्णबधिर मुलांना व्हावी तसेच, कर्णबधिर मुलांच्या समस्याही सर्वसामान्य मुलांना कळाव्यात हा दुहेरी हेतू त्यामागे आहे.

# संक्रांत

सीमेवरील जवान, शहरातील पोलीस आपले रक्षणकर्ते, तर डॉक्टर आपल्याला औषध देऊन बरे करतात. त्यांना दरवर्षी मुले तिळगूळ प्रत्यक्ष जाऊन देतात. जवानांना पाठवला जातो. समाजातील या महत्वपूर्ण घटकांबद्दल आदर, कृतज्ञता मुलांच्या मनात यातून निर्माण केली जाते.





*Lt Col Shashidhar S*
*Offg 2IC*

**9 MARATHA LI**
**PIN – 911 609**
**C/o 56 APO**

412/PRI

20 Jan 14

Head Mistress
Dhayri Karnabadir Boys School
Dhayri, Singarh Road
Pune – 411 041

1. Thank you very much for your best wishes and Tilgul on the eve of New Year and Sankrant.

2. On behalf of all ranks of 'NASHAK NAUVVI', I take this opportunity to convey our greetings and best wishes to your staff members and students of your school on the occasion of New Year celebrations.

With best wishes

नु. शा. धायरी
आवक क्रमांक धा/६९/२०१३-१४
दिनांक ०४/०२/२०१४

सौ. माधुरी देशपांडे
४/२/२०१४


हवेली पोलिस स्टेशन
वाहतूक शाखा पुणे ग्रामीण, पुणे
येथे तक्रार घेतली जाईल.
महिला व लहान मुले यांना महिला दक्षता समिती सदस्य यांची मदत हवी आहे काय
अभ्यागतांसाठी (Visitor
भेटण्याची वेळ

# गणेशोत्सव

कागद व मुलतानी माती यांच्या मिश्रणातून इ. ३ री व ४ थी तील मुले शिक्षकांच्या मदतीने गणेशमूर्ती बनवतात. यामध्ये छोट्या मुलांपासून सर्व मुले कागदाचे तुकडे करण्यास मदत करतात. मूर्तीचे विसर्जन बादलीतील पाण्यात करुन पर्यावरण साधतात. पर्यावरणाचे महत्व, नैसर्गिक संपत्तीचे रक्षण हे संस्कार मुलांवर केले जातात.











# स्वच्छता

हा उपक्रम डिसेंबर २०१४ पासून सुरु केला आहे. इ. ३ री व ४ थी ची मुले गावातील रस्ते, कचराकुंडी, देवळाचा परिसर, प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या शनिवारी शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या मदतीने स्वच्छ करत आहेत. आपले गाव स्वच्छ ठेवणे ही आपलीही जबाबदारी आहे ही जाणीव देण्याचा प्रयत्न या उपक्रमाच्या माध्यमातून केला जात आहे.

या प्रासंगिक उपक्रमांमधून चांगले भावी नागरिक होण्याच्या दृष्टीने निवासी कर्णबधिर मुलांवर संस्कार तर होत आहेतच, पण समाजातील विविध घटकांशी संपर्क येत असल्याने धीटपणा, आत्मविश्वास, संवाद साधणे या गुणांचा विकास मुलांमध्ये कळत नकळत होत आहे.

या प्रत्येक प्रसंगानंतर आमच्या छोट्या मुलांच्या इवल्याशा मनात जे विचार आले ते त्यांनी त्यांच्या खुणांच्या भाषेतून त्या त्या वेळी व्यक्त केले. त्यातील काही प्रतिक्रिया----

# प्रतिक्रिया----

१) वृद्धाश्रम भेट :- सुट्टीत घरी गेल्यावर मी माझ्या आजीकडे लक्ष देईन. मोठे झाल्यावर मी माझ्या आईबाबांना माझ्याजवळच ठेवणार.

२) तिळगूळ, राख्या :- पोलीस, सैनिक यांच्यामुळे आपले रक्षण होते त्यांना थॅन्क्यू. डॉक्टरांनाही थॅन्क्यू.

३) महात्मा गांधी जयंती :-सफाई कर्मचारी रोज रस्ते स्वच्छ करतात. रोज घाणेरडे रस्ते बघून त्यांना किती घाण वाटत असेल. आपणही रस्त्यावर कचरा टाकायचा नाही.

४) बालदिन :- मतिमंद मुले रस्त्यात कुठे दिसली तर आम्ही त्यांना हसणार नाही. अंध माणसांना रस्ता ओलांडण्यास मदत करु.

त्या त्या प्रसंगी मुलांनी व्यक्त केलेल्या या प्रतिक्रिया पाहून हे उपक्रम सुरु केल्याचे सार्थक वाटते. या उपक्रमांमधून होत असलेले संस्कार त्यांच्या मोठेपणी त्यांना चांगले नागरिक होण्याच्या दृष्टीने नक्कीच उपयोगी पडतील याची खात्री आहे.

भाषावाढीसाठी घेतले जाणारे व प्रासंगिक उपक्रम हे दोन्ही उपक्रम मी सुरु केले आहेत पण ते एखाद्या वर्गासाठी नाही तर संपूर्ण शाळेसाठी आहेत. त्यामुळे हे उपक्रम माझे सहशिक्षक तर राबवतातच पण शिक्षकेतर कर्मचारीही त्यामध्ये उत्साहाने भाग घेत असतात हे विशेष नमूद करण्यासारखे आहे.

धन्यवाद !

सौ. माधुरी द. देशपांडे

धायरी कर्णबधिर मुलांची शाळा (निवासी)

धायरी, पुणे